Literacy for a Billion

Movie: Mohityanchi Manjula
Year: 1960

Song: Zala Sakharpuda Ga Baai
Lyricist: Shanta Shelke

झाला साखरपुडा गं बाई थाटाचा
रूणूझुणू चुडा हाती गाईल गं
शालू चमचम करील जरीकाठाचा
झाला साखरपुडा गं बाई थाटाचा
रूणूझुणू चुडा हाती गाईल गं
शालू चमचम करील जरीकाठाचा
झाला साखरपुडा

सांग माझ्या कानात नवरा कसा
सांग माझ्या कानात नवरा कसा
शूर मर्द का भित्रा ससा
रूप मदन का हुप्या जसा
बृहस्पती का येडापिसा

ऐक सांगते तिकडची स्वारी
रूप देखणं नजर करारी
ऐक सांगते तिकडची स्वारी
रूप देखणं नजर करारी
मर्द मावळ्या मुलुखामधूनी
गर्जत जाई गरूड भरारी
मर्द मावळ्या मुलुखामधूनी
गर्जत जाई गरूड भरारी
नगं बाई
काय गं
नगं बाई दिमाख अशी दाऊ गं
स्वर्ग झाला तुला गं दोन बोटांचा
झाला साखरपुडा गं बाई थाटाचा
रूणूझुणू चुडा हाती गाईल गं
शालू चमचम करील जरीकाठाचा
झाला साखरपुडा

नाकाचा सांडगा गालाचा पापड
नाकाचा सांडगा गालाचा पापड
दळुबाई कांडुबाई म्हणत्यात तसा
केळीच्या पानाला तूप लावूनी
वाढल्या शेवाया खाईल कसा

शूर मराठा स्वार फाकडा
ऐट दावतो थाट रांगडा
ढाल पाठीवर हातात भाला
स्वारी जाते मुलुखगिरीला

नगं वानू
हं...
नगं वानू रूपाला अशी भाळून गं
कसा येईल फुलाला रंग देठाचा
झाला साखरपुडा गं बाई थाटाचा
रूणूझुणू चुडा हाती गाईल गं
शालू चमचम करील जरीकाठाचा
झाला साखरपुडा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*